# प्रकरण सहावे

## बळीराजा - पर्यायी विकासनीतीचा एक प्रयोग

## प्रकरण सहावे

## बळीराजा - पर्यायी विकासनीतीचा एक प्रयोग

कोणतीही नवी समाज व्यवस्था जुन्या, प्रस्थापित समाज व्यवस्थेच्या पोटातूनच जन्म घेते. प्रस्थापित समाज व्यवस्थेत निर्माण झालेल्या विविध अंतर्विरोधांच्या संघर्षातूनच तावून सुलाखून तिचा जन्म होणे शक्य असते. म्हणून पर्यायी विकासनीतीचा विचार करताना प्रस्थापित व्यवस्थेचा आणि तिच्यातल्या अंतर्विरोधाचा समग्र विचार करणे गरजेचे आहे.

### 6.1 प्रस्थापित विकासनीती :-

आजची विकासनीती ही भांडवलशाही विकासनीती आहे. जास्तीत जास्त लोकांना बाजारपेठांच्या बाहेर फेकणे, सामान्य लोकांच्या गरजांच्यासाठी उत्पादन करावयाचे नाही, ज्याच्याजवळ पैसा आहे त्यांच्यासाठीच फक्त उत्पादन करणे, या प्रकारची आजची विकासनीती आहे.

वर्गीय, जातीय, लैंगिक, वांशिक, धार्मिक आणि सांस्कृतिक विषमता कायम ठेवून विकासाची अंगे आखण्याचे सूत्र प्रस्थापित विकासनीतीचे पायाभूत लक्षण आहे. या विकासात शोषितांना (कामगार, शेतमजूर, शेतकरी, स्त्रिया, दलित इ.ना) विकास प्रक्रियेचे काही तुकडे टाकले जातात. कारण निवडणुकांच्यामध्ये ह्या वर्गाकडून सत्ता प्राप्त करावयाची असते. म्हणून शासनाकडून या जनतेला सततपणे सवलतीचे गाजर दाखविले जाते. खाजगी व शासकीय भांडवल वाढविणे आणि त्यांचे बूड स्थिर करणे हेच या विकास प्रक्रियेचे मुख्य काम असते.

भांडवल आणि माणसाच्या श्रमशक्तीसह क्रयवस्तूंचे सार्वत्रिकीकरण करणे व प्रभुत्व वाढवून नेणे हे प्रस्थापित विकासनीतीचे व्यवच्छेदक लक्षण आहे. अधिकारांचे

आणि निर्णयांचे केंद्रीकरण हे या विकासनीतीचे खास वैशिष्टय असते. एका बाजूला प्रचंड प्रदूषण ≬धूर, मळी, अणूवीज निर्मिती प्रक्रियेतील गाळ व उत्सर्ग, विषारी वायू इ.≬ व दुस-या बाजूला निसर्गाला वैराण बनविणारा नाश या गोष्टी प्रस्थापित विकासनीतीशी अतूटपणे जोडलेल्या असतात. माणसाचे शोषण व त्यांच्यावरचे प्रभुत्व याबरोबरच निसर्गावर हुकूमत गाजवणे आणि भांडवल वाढविण्यासाठी निसर्गाला ओरबाडून संपविणे ही या व्यवस्थेची अंगभूत लक्षणे आहेत. या विकासनीतीच्या मूलभूत लक्षणांनी शेतीव्यवस्था, जंगले, हवा, पाणी, वनस्पती, बियाणे, माती आणि माणसे बळी पडलेली असतात.

माणसांच्या आरोग्यवर्धक जगण्याला आवश्यक असणा-या अन्न-धान्य, पालेभाज्या, फळे, तेलबिया इत्यादी वस्तू जीवनोपयोगी वस्तू म्हणून उत्पादित करण्यापेक्षा त्या अधिकाधिक सार्वत्रिक प्रमाणात विक्रीच्या वस्तू म्हणून त्याचे उत्पादन केले जाते. त्यामुळे बाजारपेठांचे नियम आणि चढ-उतार यावर शेती उत्पादनाची स्थिती अवलंबून आहे. यातूनच शेतीत कोणत्या पिकाचे उत्पादन घ्यायचे हे ठरत आहे. जास्तीत जास्त उत्पादन मिळविण्यासाठी संकरित बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके यांचा बेसुमार वापर केला जातो. परंतु याचा दुष्परिणाम लोकांच्या आरोग्यावर होतो. याची कोणालाही पर्वा नाही. तसेच औद्योगिक क्षेत्रातून तयार होणा-या वस्तू ≬खते, कीटकनाशके, बी-बियाणे, अवजारे, साठवणुकीची साधने इत्यादी≬ आणि बँक वगैरे सारखे वित्तभांडवल यांच्यावर आज पूर्णपणे शेतीव्यवस्था अवलंबून आहे, हे संबंध देवाण-घेवाणीचे नसून अवलंबित्वाचे असतात. कर्ज आणि कारखाने, कंपन्यांमध्ये तयार होणा-या या वस्तू नसतील तर शेती पिकविताच येणार नाही अशी अवस्था प्रस्थापित विकासनीतीतून तयार होत गेली आहे. आज ती जवळ जवळ सार्वत्रिक झाली आहे. या प्रकारच्या शेतीपध्दतीमुळे अन्नधान्य, फळे, भाजीपाला, जळण, चारा, तेलबिया या जीवनावश्यक गोष्टींच्या बाबतीत विकेंद्रीत पध्दतीने स्वतःच्या पायावर उभी राहणारी शेती संपली आहे. ऊस, कापूस, कांदा, तंबाखू, द्राक्षे यासारख्या बाजारू पिकांचे आणि एक पीक तंत्राचे प्रभुत्व शेती व्यवस्थेवर प्रस्थापित झाले आहे. या पध्दतीमुळे शेतजमिनीची रचना बिघडली आहे. जमिनीचे "फूल" खलास झाले आहे. तिच्यातील आवश्यक जीवजंतू जवळ जवळ संपले आहेत. एकतंत्री पीक पध्दत, पिकांचा फेरपालट नसणे, जैविक पदार्थांचा ≬पाला-पाचोळा, शेण-मूत्र, हाडे इत्यादी≬ अभावानेच वापर, रासायनिक खते आणि कीटकनाशके यांचा

भरमसाट वापर यामुळे जमीन ओसाड झालेली आहे. कालांतराने तिचे एक प्रकारच्या वाळवंटात रूपांतर होईल अशी प्रक्रिया चालू आहे.

या ढासळत चाललेल्या परिस्थितीच्या परिणामी काही भागात दुष्काळामुळे जमीन ओसाड पडली आहे तर काही ठिकाणी ती मीठ फुटून नापीक व भकास झाली आहे. आदिवासी व ग्रामीण समाजाच्या जीवनाचे प्रमुख अंग असलेले जंगल उजाड झाले आहे. बाजाराच्या माध्यमाशिवाय फळे, पालेभाज्या उपलब्ध होत नसल्यामुळे आणि प्रत्येक कुटुंबात स्वतःच्या उपभोगापुरतेही त्यांचे उत्पादन होत नसल्यामुळे अनेक अनावश्यक टॉनिक वगैरे औषधांचा सुळसुळाट झाला आहे. आरोग्य चांगले राहून रोग होणार नाहीत अशी व्यवस्था कोलमडली, त्याउलट औषध कंपन्यांचा धंदा आणि डॉक्टर्स तेजीत आहेत जी अनेक उपयोगी औषधे शेती विभागात वनस्पतीच्या रूपाने होती किंवा जंगलात होती ती नाहीशी होत आहेत. त्यावर संशोधनसुध्दा अभावानेच केले जाते. यामुळे आरोग्य क्षेत्रातही भांडवलांचे, कारखानदारीचे प्रभुत्व निर्माण झाले आहे.

बाजारू वस्तूंचा सोस, माणसांच्या वापरासह सर्व गोष्टी पैशांच्या मापाने मोजण्याचे मूल्य या गोष्टी प्रस्थापित विकासनीतीचा एक महत्त्वाचा आधार आहेत. कला, साहित्य, शिक्षण, वैज्ञानिक संशोधन यासारख्या नवनिर्मितीच्या क्षेत्रांना भांडवलाची व भांडवलवाल्यांची बटीक करण्याची परिस्थिती ही प्रस्थापित विकासनीतीतून जन्माला येणारी अपत्ये आहेत. आज समाजाच्या सर्व थरांच्या संस्कृतीमध्ये या अपत्यांचा सुळसुळाट आहे.

या मूल्यांच्या आधारावर सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय व्यवहार सर्वदूर मुरलेला असल्यामुळे भांडवल व शासन सत्ता यांना फार मोठया प्रमाणावर सशस्त्र दंड यंत्रणेचा वापर न करतासुध्दा बिनधोकपणे स्वतःचे राज्य चालवायला मोकळे रान मिळते. या राज्याच्या कारभाराला शोषित वर्ग, जाती आणि स्त्रिया इत्यादींची सर्वसाधारण मान्यता मिळण्याची परिस्थितीसुध्दा तयार होते.

शोषणाची व दडपणुकीची समाजातील जुनी अंगे प्रस्थापित व्यवस्थेत नव्या स्वरूपात मुरडलेल्या आशयाने अस्तित्वात आहेत. या व्यवस्थेची विकासनीती त्यांना चपखलपणे स्वतःच्या ओघात सामावून घेते.

पूर्वीपासून सुरू असलेले स्त्रियांचे वेगवेगळ्या स्वरूपाचे शोषण आजही या व्यवस्थेत चालू आहे. भारतातील भांडवलीपूर्व समाजाचा मूलाधार असलेली जातीव्यवस्था मोडून जाण्याची प्रक्रिया या समाजव्यवस्थेत घडली आहे. पण त्याचवेळी जातीय संबंधाचे नवे स्वरूप अस्तित्वात आले आहे. प्रस्थापित विकासनीतीने नव्या प्रकारच्या जाती जमातीय संघर्षांना जन्म दिला आहे. आदिवासी समाजाचे स्वायत्त जीवन या विकासनीतीने उदध्वस्त केले आहे.

एकंदरीत प्रस्थापित विकासनीती ही मूठभर हितसंबंधी मंडळीचा विकास घडविते तर बहुसंख्य असणा-या राबणा-या स्त्री-पुरूषांना विकासाच्या काठावर ठेवते. या वर्गाला शोषण, दुःख आणि रोगट जीवन यांचीच देते.[1]

## 6·2 पर्यायी विकासनीती :-

प्रस्थापित समाज व्यवस्थेच्या पोटातून आणि प्रस्थापित विकासनीतीच्या संदर्भातच शोषणमुक्ती आणि समृध्दीवर आधारलेल्या समाजाला साकार करणा-या पर्यायी विकासनीतीचा जन्म होऊ शकतो.

टिकाव् वाढत जाणारी आणि निरोगी समृध्दी व शोषणमुक्ती ही ध्येये, राबणा-या स्त्री-पुरूषांच्या लोकशाही सहभागातून साध्य करण्याच्या दृष्टीने आपल्याला पर्यायी विकासनीतीचा विचार करायचा आहे. या विचारात जंगल, जमीन, पाणी, उद्योग, पशू आणि मनुष्यबळ यांच्या समग्र प्रवाही आणि जिवंत संयुक्त प्रक्रियेचा विचार अंतर्भूत असावा लागेल.[2]

प्रथम पर्यायी विकासनीतीच्या संदर्भात असणारे महत्वाचे मुद्दे नमूद करणे येथे महत्त्वाचे आहे. या पर्यायी विकासनीतीच्या वितरण व्यवस्थेत आयातीवर आधारलेल्या वस्तू निर्मितीला पर्याय दिला जातो. स्थानिक पातळीवर आणि नगण्य गुंतवणुकीच्या आधारावर विकेंद्रीत उद्योग चालू होतात. तांत्रिक निर्णयात प्रत्यक्ष लाभधारकांचा सहभाग घेण्याची पध्दत अवलंबिली जात असल्यामुळे योजना जास्त शास्त्रीय, मनात रूजणारी आणि स्वस्त होते. वैज्ञानिक पध्दती आणि पाणी वितरण वापर यांची सांगड शेती करणा-यांच्या विचार व्यवहारांचा जिवंत भाग बनते. शेतीत निर्माण होणा-या वस्तूंच्या आधारावर विविध उद्योग सुरु करून जास्तीत जास्त स्वयंपूर्ण आणि विकेंद्रीत कृषी औद्योगिक व्यवस्था आणण्यासाठीच्या विचार व्यवहाराची वाट मोकळी होते.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे शेतीचे, पाण्याचे, जंगलाचे, बियाणांचे, सहकारी संस्थांचे खाजगीकरण करू पाहणा-या प्रत्येक प्रयत्नाला व प्रचलित विकासनीतीला पुढे रेटू पाहणा-या सर्व सरकारी धोरणांना प्रखरपणे विरोध आपण केला पाहिजे· ही भांडवली विकासाची वाट रोखल्याशिवाय आत्मनिर्भर, जनवादी, ख-या विकासाची वाट खुली होणार नाही· पर्यायी विकासनीतीचा अवलंब करण्यासाठी काही गोष्टी साध्य करून घेणे महत्त्वाचे आहे·

1· सर्व नियोजित प्रकल्प आणि योजना आवश्यक त्या सुधारणांसह पूर्ण करून सिंचनक्षेत्र वाढविले पाहिजे· सिंचनासाठी साठवलेल्या पाण्याची वितरण व्यवस्था व देखभाल व्यवस्था सुधारली पाहिजे· यात पाणी मोजून द्यावे, त्याचे व्यवस्थापन विकेंद्रीत पध्दतीने व्हावे व त्याचे वाटप समान पध्दतीने व्हावे·

2· पिण्याच्या पाण्याचा व पीक संरक्षणाचा प्रश्न अग्रहक्काने सोडवला पाहिजे· त्यासाठी फटकळ योजना न राबवता पाणलोट क्षेत्र विकासयोजना त्या त्या क्षेत्रातील शेतकरी-शेतमजूर यांच्या सहकार्याने आणि स्थानिक परिस्थितीनुरूप आखल्या पाहिजेत· उपलब्ध होणारे पाणी पाणलोट क्षेत्रातील सर्व कसणा-या कुटुंबाना समान मिळाले पाहिजे·

3· रोजगार हमी योजनेखाली पाणलोट क्षेत्र विकास, कालवे, तळी, चरसिंचन तलाव, कोल्हापूर बंधारे यासारखी पिकाचे पाणी व पीक संरक्षणासाठी पाणी पुरवठयाची कामे पूर्ण केली पाहिजेत· ही कामे कंत्राटदारामार्फत करू नयेत· या कामासाठी बांधकाम उद्योगात नेमून दिलेले वेतन मिळाले पाहिजे·

4· ऊसाच्या क्षेत्राची अमर्याद वाढ व नवीन साखर कारखान्यांना परवानगी देणे थांबवावे· चोरून ऊसाला पाणी देणे पूर्ण थांबले पाहिजे·

5· हाराकी (हायब्रीड बियाणे - रासायनिक खते - कीटकनाशके) शेती तंत्राचा प्रसार थांबवून जैव तांत्रिक खते, कीटकनियंत्रण व सुधारित बियाणे यावर आधारित शेतीबाबत शिक्षण झाले पाहिजे व त्याला प्रोत्साहन मिळाले पाहिजे·

6· ऊसाप्रमाणे इतर कांदे, बटाटे, फळे, तेलबिया इत्यादी शेतीमालाला हमी किंमत मिळाली पाहिजे· त्यामुळे इतर सिंचित पिकांपासून भरवशाचे उत्पन्न मिळेल व त्यांच्या उत्पादनाला प्रोत्साहन मिळेल व ऊसाची भरमसाठ वाढ कमी होईल·

7· ग्राम सभांना स्थानिक नियोजनाचे अधिकार देवून जनवादी व विकेंद्रीत नियोजन झाले पाहिजे·

8· मुक्त बाजारपेठेला आणि ती लादणा-या नाणे निधीला व त्याच्या कर्जांना विरोध केला पाहिजे·

9· स्वस्त धान्य दुकानातून धान्य, डाळी, साखर, गोडेतेल, रॉकेल अशा चौदा जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा नियमितपणे व स्वस्त दरात झाला पाहिजे· स्वस्त धान्य दुकानांना पुरवलेला धान्य कोठा जाहीर झाला पाहिजे·

10· रोहयो वर धान्याची कुपने मिळाली पाहिजेत व त्यावर धान्य मिळण्याची व्यवस्था झाली पाहिजे·[3]

या प्रकारचे पर्यायी विकासनीतीचे मुख्य उद्देश आहेत· या उद्दिष्टांच्या सफलतेसाठी काही श्रमिक संघटना देशात कार्यरत आहेत· महाराष्ट्रात अशाच प्रकारच्या शेतकरी-शेतमजूरांच्या संघटना वेगवेगळे प्रश्न घेवून पर्यायी विकासनीतीच्या सफलतेसाठी प्रयत्न करीत आहेत· यापैकीच खानापूर तालुक्यातील "मुक्ती संघर्ष चळवळ" ही एक आहे· या चळवळीने बळीराजा धरणाच्या रुपाने पर्यायी विकासनीतीचा एक नवा प्रयोग सुरू केलेला आहे· शेती विकासाची पध्दती व शासकीय धोरण विचारात घेतले तर या देशातील शेतकरी-शेतमजूर हा कधीच दारिद्र्य, पिळवणूक, कर्जाचा बोजा यातून मुक्त होवू शकणार नाही· या परिस्थितीतून संपूर्ण बदल करण्यासाठी आज खरोखरच पर्यायी विकासनीतीचा अवलंब करणे ही अत्यंत गरजेची आणि आवश्यक अशी बाब आहे·

## 6·3 बळीराजा : पर्यायी विकासनीतीचा एक प्रयोग

महाराष्ट्रात उपलब्ध पाण्याचा आढावा घेवून शासनाने अनेक ठिकाणी धरणे, बंधारे बांधलेले आहेत· अलिकडे काही साखर कारखान्यांनी वसंत बंधारे सारखे छोटे बंधारे

बांधण्याचे काम सुरू केले आहे. या प्रकारची परिस्थिती असताना, बळीराजा सारखा प्रयोग येथे सुरू होऊन प्रस्थापितांना अंचबा वाटण्यासारखी परिस्थिती या ठिकाणी निर्माण झालेली आहे हे सत्य नाकारून चालणार नाही. बळीराजाचे महत्त्व त्याच्या निर्मितीत तर आढळतेच त्याचबरोबर बळीराजाने शासन आणि समाज यांना एक नवी दिशा दिलेली आहे.

पर्यायी विकासनीतीच्या प्राथमिक आणि काही विशिष्ट अंगांचा विकास कष्टकरी स्त्री-पुरूषांच्या ताबडतोबीच्या चळवळीत कसा होऊ शकतो. याचे एक चांगले उदाहरण "बळीराजा स्मृती धरणा"च्या निमित्ताने पुढे आले आहे.

"बळीराजा स्मृती धरण" म्हणजे केवळ एक नवी तांत्रिक कलाकुसर नाही. मानवमुक्तीचे, शोषणमुक्तीचे आणि समृध्दीचे अंतिम ध्येय साध्य करण्याकडे वाटचाल करणा-या संघर्षाचा तो एक अंतिम टप्पा आहे. मानव निसर्ग संबंधाच्या निरोगी, संतुलित, मैत्रीपूर्ण अशा नव्या नात्याची प्रस्थापना करण्याकडे पडलेले ते एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

बलवडी-तांदुळवाडीच्या बळीराजा धरणाने सुरू केलेली पर्यायी विकासनीती व्यापक संदर्भात अभ्यासणे महत्वाचे आहे.

1. <u>आधुनिक तंत्रज्ञान</u> :-

बळीराजा धरणाचे प्लॅन इस्टिमेट प्रसिध्द सिचंनतंज्ञ श्री.के.आर.दाते यांनी केले आहे. बळीराजा धरणाची लांबी 120 मीटर्स, उंची 4.5 मीटर्स आणि रूंदी 18 फूट आहे. अशा प्रकारचे हे छोटे धरण बांधून या व्दारे कष्टक-यांनी एक नवी दिशा देण्याचा प्रयत्न केलेला आहे. शासनाने अनेक मोठी धरणे, बंधारे बांधून काही ठराविक प्रदेशांचा, ठराविक लोकांचाच विकास साधण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्याचबरोबर अशा धरणातून होणा-या फायद्यापेक्षा तोटयांचीच गंभीरता जास्त प्रमाणात वाढलेली दिसते. मोठया धरणांच्यामुळे विस्थापीत होणारी लोकसंख्या, धरणाखली बुडणारी सुपीक जमीन, पाण्याचे विषम पध्दतीने वाटप, त्यामुळे वाढणारे गरीब श्रीमंत भेदाभेद, धरण लाभ क्षेत्राखाली येणा-या जमिनीचे खरेदी-विक्री व्यवहार या गोष्टी समाजात प्रकर्षाने जाणवतात. अशा प्रकारच्या समाजाला घातक आणि निसर्गाचा समतोल बिघडवणा-या

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

धरण पध्दतीला बळीराजाने पूर्णपणे दूर फेकून दिले. बळीराजाचा आराखडा तयार करीत असताना वरील प्रकारच्या समस्या निर्माण होणार नाहीत याची पूरेपूर काळजी घेतली आहे. तसेच नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून कमीत कमी खर्चात म्हणजे फक्त 3,09,000 रूपयात हे धरण बांधले आहे. सरकारी दरानुसार या धरणाचा खर्च 35 ते 40 लाखाच्या घरात गेला असता.[4]

बळीराजा धरणाचे बांधकाम दोन टप्प्यात झाले आहे. धरणाच्या पहिल्या टप्प्याचे 2.5 मीटर उंचीपर्यंतचे बांधकाम हे पारंपरिक पध्दतीने केले आहे. यासाठी लागणारे दगड, वाळू हे बांधकाम साहित्य येरळेच्या पात्रातून उपलब्ध झालेले आहे. धरणाच्या दुस-या टप्प्याच्या बांधकामासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. धरणाच्या 2.5 मीटर बांधकामाच्या वरच्या उंचीसाठी आपोआप उघडझाप करणारी (स्वयंचलित) दोन मीटर उंचीची दारे बसविली आहेत. पूराच्या वेळी ही दारे पाण्याच्या दाबाने आपोआप वाकली जावून पूराचे पाणी वाहून जाईल आणि पूराचा भर ओसरल्यानंतर ही दारे आपोआप उभी राहून नदीत येणारे बाकीचे पाणी धरणात साठवून ठेवण्याचे कार्य करतील.

धरणात साठणा-या गाळाने धरणाची कार्यक्षमता संपुष्टात येवून, धरण बांधणीचा उद्देश सफल होत नाही आणि हाच प्रश्न अनेक धरणाच्या बाबतीत निर्माण झाला आहे. बलवडीचा जुना बंधारा या पध्दतीने पूर्णपणे निकामी ठरला आहे. म्हणूनच बळीराजा धरणाची उभारणी करताना धरणाच्या बुडाशी चार "फ्लशडोअर्स" बसविण्यात आली आहेत. या दरवाजातून धरणात पूराच्या वेळी येवून साठणारा गाळ आपोआप वाहून नेला जातो. त्यामुळे धरण आपोआप स्वच्छ तर ठेवले जाते. त्याचबरोबर धरणाच्या कार्यक्षमतेलाही बाधा येवू शकत नाही.

धरणाच्या बांधकामाप्रमाणेच धरणाच्या जलसिंचन योजनेसाठीही शास्त्रीय दृष्टिकोण, आधुनिक तंत्रज्ञान आणि कमीत कमी खर्च या गोष्टींना प्राधान्य दिलेले आहे. बळीराजा धरणातून तांदुळवाडी बाजूच्या 300 एकरासाठी पाणी वितरण व्यवस्था पूर्ण झाली आहे. या व्यवस्थेला पारंपरिक पध्दतीने 30 लाख रूपये खर्च येतो. परंतु पर्यायी पध्दतीने हेच काम फक्त 12 लाख रूपयात पूर्ण होत आहे. या जलसिंचन योजनेसाठी, आयात

केलेल्या कच्च्या मालाच्या आधारावर बनविलेल्या पी·व्ही·सी·पाईप न वापरता भारतातल्या पेट्रोलियमजन्य कच्च्या मालाचा उपयोग करून बनविलेली खास प्रायोगिक पाईप वापरली आहे· त्यासाठी लागणारे टणक आवरण स्थानिक पातळीवरच तयार केले आहे· या योजनेत केवळ गुरुत्त्वाकर्षणाचा योग्य वैज्ञानिक उपयोग केल्यामुळे प्रेशर पाईपचा उपयोग अत्यंत कमीत कमी करण्यात आला आहे· त्यासाठी उभारण्यात येणा-या टाक्यासुध्दा नव्या पध्दतीने आणि कमी खर्चात केल्या जात आहेत·[5] एकंदरीत कमीत कमी खर्चात पाणी अडवून ते शेतीला योग्य प्रमाणात पुरविण्याचा योजना आधुनिक तंत्रज्ञान आणि शास्त्रीय दृष्टिकोणाचा योग्य वापर करून पूर्ण केली आहे आणि पर्यायी विकासनीतीची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू केली आहे·

2· **उपलब्ध नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर :-**

निसर्ग आणि शासनाच्या कोपामुळे येथील जनतेला अनेक वर्षे भीषण दुष्काळी परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे· त्यामुळे येथील लोकांनी अभ्यास करून दुष्काळ निर्मूलनाचा कार्यक्रम हाती घेतला· दुष्काळी भागातून वाहणा-या नद्यांमधील वाळू व्यापारी कंत्राटदार बेसुमारपणे उचलतात· त्यांचा नदीत पाणी अडण्या-मुरण्यावर आणि पर्यायाने पर्यायणावर होणारा विपरीत परिणाम बळीराजा चळवळीने पहिल्यांदाच उजेडात आणले· स्थानिक राबणा-या जनतेचे जीवन उद्ध्वस्त करून तिच्या परिसरातील निसर्ग संपत्ती लुटणे आणि तथाकथित विकासासाठी वापरणे या व्यवहाराला चळवळीने विरोध केला· निसर्ग संपत्तीचा वापर "महसूल उभा करण्यासाठी" आणि मन मानेल त्याप्रमाणे करण्याच्या शासकीय व्यवहाराला चळवळीने आव्हान दिले· स्थानिक राबणा-या जनतेचे जीवन आणि परिसर फुलविण्याच्या प्राथमिक अटीवरच तिथल्या निसर्ग संपत्तीचा उपयोग ठरला पाहिजे हे नवे तत्व पुढे आणले· याच नैसर्गिक संपत्तीचा वापर दुष्काळ निर्मूलनासाठी आणि पर्यायाने पर्यावरणाचे संतुलन निरोगी पध्दतीने पुनः उभारणीसाठी कसा केला जाऊ शकतो हा विचार बळीराजा धरणाच्या उभारणीतून चळवळीने प्रत्यक्ष व्यवहारात आणला·

बळीराजा धरणासाठी शासनाकडून लोकलढयाच्याव्दारे वाळू विक्रीचे परवाने मिळून भांडवल उभे केले व या भांडवलातूनच बळीराजाचे बांधकाम पूर्ण केले· बळीराजा

धरण चळवळीला 17 ऑक्टोबर 1986 ते 30 एप्रिल 1990 अखेर वाळू परवाने मिळाले· वाळू परवान्यातून केलेल्या वाळू विक्रीचे 12,33,858 रू·उत्पन्न मिळाले· त्यातून रॉयल्टी म्हणून शासनाला 4,66,950 रू· दिले·[6] या वाळू विक्रीच्या भांडवलावरच बळीराजा उभा राहू शकला· तसेच धरणाच्या बांधकामासाठी दगड, वाळू, हे साहित्य येरळेच्या पात्रातूनच उपलब्ध करण्यात आले· एकंदरीत उपलब्ध नैसर्गिक संपत्तीचा वापर करून बळीराजा धरणाची उभारणी केली·

3· **स्वयंनिर्णय :-**

जनकल्याण हे लोकशाहीचे मुख्य उद्दिष्ट· परंतु शासन जेव्हा हे उद्दिष्ट सफल करण्यात अयशस्वी होते तेव्हा स्वतःच्या विकासासाठी लोकच पुढे येतात आणि स्वतःचा विकास स्वतःच घडवून आणतात हे बळीराजाने दाखवून दिले आहे· येथील कायमस्वरूपी दुष्काळ हटविण्यास सरकार असमर्थ ठरले तेव्हा "शासनाला दुष्काळ घालवायचा नसेल, त्याच्याकडे दुष्काळ घालविण्याचे नियोजन नसेल तर दुष्काळ घालविण्याचा विचार राबणा-या जनतेला स्वतःलाच केला पाहिजे त्याचे नियोजनसुध्दा तिनेच केले पाहिजे, संघर्ष करून ते अंमलात आणण्यासाठी शासनाला भाग पाडले पाहिजे असा ठाम विचार बळीराजा चळवळीने पुढे आणला· दुष्काळ हटविण्यासाठी आणि स्वतःच्या विकासासाठी जनतेनेच धरण बांधून, शासन घालविल तेव्हा दुष्काळ जाणार हा व्यवहार बळीराजाने फेटाळला· दुष्काळ निर्मूलनाचे नियोजन आमचे आम्ही करू शकतो, त्यासाठी लोक वैज्ञानिक दृष्टिकोन असलेल्या लोकांशी दोस्ती करू शकतो आणि असे नियोजन अंमलात आणण्याचा आम्हाला हक्क आहे हे त्यांनी धरण बांधून सिध्द केले·

तसेच धरणाच्या बांधकामासाठी लोकशक्तीच्या जोरावर वाळू परवाने घेऊन नैसर्गिक साधन संपत्तीवर शासनाप्रमाणेच स्थानिक लोकांचाही हक्क आहे हे तत्व पुढे आणले·

4· **मनुष्यबळाचा वापर :-**

बळीराजा धरण बांधण्यासाठी बलवडी-तांदुळवाडी गावातील कष्टकरी जनतेने श्रमदान केले· त्याचबरोबर या धरणपूर्तीसाठी राज्यातील विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, डॉक्टर, वकील, स्वातंत्र्यसैनिक, पत्रकार, कष्टकरी, शेतमजूर, कामगार,

सिनेकलाकार, के.आर.दाते सारखे अभियंते, झोपडपट्टी संघटना, होमगार्ड, वीर सेवा दल, राष्ट्रीय सेवा योजना या संस्था व मंडळींनी आपापल्या परीने श्रमदान केले आहे. या पध्दतीने बळीराजा धरण हे ग्रामीण भागातील रंजल्या गांजल्या शेतकरी, शेतमजूर तसेच राज्यातील बुध्दीवंत मंडळी आणि सेवाभावी वृत्तीच्या संस्थांच्या श्रमदानातून उभे राहिले आहे. देशातील हे असे एकमेव धरण आहे की ज्याच्या निर्मितीत ज्ञान आणि श्रमाची सांगड घालण्यात आली आहे. एकंदरीत मनुष्यबळाचा पुरेसा वापर करून बळीराजाची निर्मिती केली आहे आणि यातून पर्यायी विकासनीतीचे ध्येय साकार करण्यात आले आहे.

5. <u>स्वयंरोजगार निर्मिती</u> :-

बळीराजा धरणाच्या बांधकामासाठी आवश्यक असणारा मजूर पुरवठा या परिसरातच उपलब्ध झाला. दुष्काळामुळे निर्माण झालेला रोजगार प्रश्न मिटविण्यासाठी धरणाची उभारणी केली आहे. त्यामुळे तेथील राबणा-यांना धरण बांधकामाच्या निमित्ताने रोजगार तर मिळालाच शिवाय दुष्काळ हटविण्याचे महान कार्य आपल्या हातून होत आहे याचा त्यांना अभिमान वाटत होता. तसेच धरण बांधकामासाठी भांडवल उभा करण्याच्या हेतूने चळवळीने वाळू विक्री परवाने मिळविले होते. या वाळू विक्रीच्या उपक्रमात ट्रकमध्ये वाळू भरून देण्याचे काम येथील मजूरांना मिळून एक प्रकारचा रोजगार उपलब्ध झाला आहे. तसेच बळीराजा पाणीपुरवठा योजनेतून फुलणा-या कष्टक-यांच्या स्वतःच्या शेतीतून प्रत्येक कुटुंबातील कमीत कमी दोन व्यक्तींना वर्षभर पुरेल इतका रोजगार उपलब्ध होणार आहे आणि त्याचप्रमाणे बळीराजा पाणी पुरवठयासाठी आवश्यक असणा-या पाईप्सचे टणक आवरण स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध होत राहणार आहे. कारण टणक आवरणाबरोबरच त्याच रीतीत (पध्दतीत) थोडा बदल करून घरावरचे "पत्रे" तयार करता येऊ शकतात. अत्यंत अल्प साधन सामुग्रीच्या आधारावर अगदी मजुरीचे जीवन असणारी माणसेसुध्दा हा उद्योग करू शकतात. यासाठी आज वापरल्या जाणा-या तारेऐवजी पुढे बांबूचा वापर करण्याचा प्रयोग चालू आहे.[7] बळीराजा धरणाठिकाणी चळवळीने रोपवाटिका तयार करण्याची योजना सुरू केली आहे आणि यामध्ये विधवा, परित्यक्ता महिलांना रोजगार उपलब्ध झाला आहे. या प्रकारे बळीराजाने स्थानिक पातळीवरच रोजगार निर्मिती केली. त्यामुळे बेकारांचे शहराकडे जाणारे लोंढे तर थांबलेच त्याचबरोबर ते स्वाभिमानाने स्वावलंबी जीवन जगू लागले.

6· **समान पाणी वाटप योजना :-**

पर्यायी विकासनीतीचा अवलंब करण्यासाठी पिण्याच्या पाण्याचा आणि पीक संरक्षणाचा प्रश्न अग्रहक्काने सोडविणे महत्त्वाचे असते· तसेच स्थानिक शेतकरी-शेतमजूर यांच्या सहकार्याने आणि स्थानिक परिस्थितीनुसार पाणलोट क्षेत्र विकास योजना आखून त्यामधून उपलब्ध होणारे पाणी सर्व कसणा-या कुटुंबाना मिळणे आवश्यक असते, आणि याच तत्वाचा प्रामुख्याने बळीराजाने स्वीकार करून प्रत्यक्षात पर्यायी विकासनीती सुरु केलेली आहे·

बलवडी-तांदुळवाडीच्या कष्टकरी जनतेने येथील पिण्याच्या पाण्याची टंचाई आणि शेतीसाठी पाणी पुरवठा योजनांचा अभाव या समस्यांवर मात करण्यासाठी स्वतःच बळीराजा धरण बांधले आणि राबणा-या सर्व स्त्री-पुरूषांना धरणातील पाण्याचा हिस्सा दिला आहे·

बळीराजा धरण हे कष्टक-यांनी दुष्काळावरचा योजलेला एक उपाय आहे हे धरण नसून ते दुष्काळ निर्मूलनाचे एक महत्त्वपूर्ण धोरण आहे· बळीराजा धरणामुळे फार मोठे क्षेत्र बागायतीखाली अगर ओलिताखाली येणार नसले तरी या धरणामुळे पाण्याच्या साठयावर असलेली प्रस्थापित बडया शेतक-यांची मक्तेदारी मात्र संपुष्टात येणार आहे· त्यामुळे गरीब-श्रीमंताची दरी काही प्रमाणात **कमी होणार** आहे· बळीराजा धरणात साठणा-या पाण्यातून जास्तीत जास्त राबणा-या स्त्री-पुरूषांचा दुष्काळ घालविण्याचे तत्व ग्रामस्थांनी स्वीकारले आहे· या परिसरातील पिके नेमकी किती पाऊस पडल्यामुळे आणि कोणत्या वेळी पावसाची ओढ बसल्याने वाया जातात· याचा शास्त्रीय अभ्यास करून कमीत कमी पाण्यात जास्तीत जास्त लोकांना जगविणारी पिके घेण्याचे कष्टकरी जनतेने ठरविले· दुष्काळ निर्मूलनासाठी जमीन आणि पाणी यांचे शास्त्रीय नियोजन करण्याचा मार्गच बळीराजाने व्यवहारात प्रत्यक्षात आणला आहे· याचमुळे बळीराजा हे सर्वसामान्य धरण न राहता ते दुष्काळ हटविण्याचे आणि पर्यायी विकासनीतीचे एक तंत्र बनत गेले आहे· पाण्यासारखे शस्त्र हाती घेवून आणि शास्त्रीय तंत्रज्ञानाची ढाल जोडीला घेवून दुष्काळरूपी राक्षस नष्ट करण्याचा जणू विडाच या कष्टक-यांनी उचलल्याचे दिसते·

बळीराजा धरणाची निर्मिती सामाजिक क्रांतीतून झाल्याचे दिसते· तसेच सामाजिक बांधिलकीचे तत्व उराशी बाळगून धरण निर्मितीनंतरही सामाजिक समता, न्याय ही

तत्वे प्रत्यक्षात प्रस्थापित केल्याचे दिसते· बळीराजा स्मृती धरण हे देशातील इतर धरणांच्यापेक्षा महत्त्वपूर्ण असे आहे· कारण या धरणाची मूलभूत कल्पनाच अशी आहे की, "उपलब्ध असलेले पाणी समाजातील प्रत्येकाच्या मालकीचे असून त्याची वाटणी जात, पात, लिंग, धर्म, संप्रदाय असा भेदाभेद न करता झाली पाहिजे·" सामाजिक क्रांतीच्या उद्देशाने बळीराजाने या विचारांची प्रत्यक्षात अंमलबजावणी केली आहे· "ज्याची जमीन जास्त त्याला पाणी जास्त" आणि ज्याला जमीन नाही त्याला शेतीसाठीच्या पाण्यावर हक्क नाही" ही प्रस्थापित तत्वे व व्यवहार बळीराजाने नाकारला· प्रत्येक व्यक्तीचा धरणाच्या पाण्यावरचा हक्क प्रस्थापित केला· बळीराजा धरणातील पाणी सर्व जाती, धर्म, संप्रदाय, वंशाच्या लोकांना समन्यायी वाटप पध्दतीने दिले आहे·[8]

बळीराजा धरणातील पाण्यावर दोन्ही गावातील सर्व ग्रामस्थांना हक्क देवून सर्वांचाच दुष्काळ हटविण्यासाठी पाण्यावरील सर्वांचा समान हक्क मान्य करणारा ठराव ग्रामस्थांनी बैठकीत मंजूर केला· अशा स्वरूपाचे एक करारपत्र तयार केले· भविष्यकाळात जुन्या लोकांनी ठरविलेल्या या पध्दतीला कुणी शह देवू नये म्हणून करारपत्राला कायदेशीर स्वरूप देण्यात आले· बळीराजा धरणातील पाण्याचे वाटप पुढील नियमानुसार केले आहे·

1· प्रत्येक राबणा-या स्त्री/पुरूषाला एक भाग - शेअर्स रू·10/- देवून किंवा धरणावर एक दिवसाचे श्रमदान करून प्राप्त करता येईल·

2· प्रत्येक भागधारकाला जात-पात, लिंग, संप्रदाय यांचा विचार न करता पाण्याचा वाटा मिळेल· परंतु शेती मालकीच्या क्षेत्रावर तो अवलंबून नसेल· जास्तीत जास्त 5 सदस्य असलेल्या कुटुंबाला हा वाटा किंवा शेअर्स मिळेल·

3· भूमीहीन लोकांनासुध्दा पाण्याचा शेअर्स (भाग) मिळेल आणि तो पाण्याचा हिस्सा ते विकू शकतात किंवा दुस-यांची जमीन कसण्यासाठी त्याचा वापर करू शकतात·

4· 1 जनू ते 15 जानेवारी या दरम्यान बळीराजातील उपलब्ध पाणी ज्वारी, बाजरी, भूईमूग यासारख्या कोरडवाहू पिकांसाठी दिले जाईल आणि दि·15 जानेवारी पासून प्रत्येक वर्षी धरणातील पाण्याचा साठा पिण्यासाठी वापरला जाईल·

5. 5,000 लोकांची गरज पुरवू शकेल या पध्दतीने पिण्याचे पाणी साठविले जाईल आणि हा राखीव साठा म्हणून ठेवण्यात येईल आणि त्याबरोबर ठराविक पाण्याचा साठा रोपवाटिका व इतर वृक्ष लागवडीसाठी ठेवण्यात येईल. प्रतिमाणसी 2 गुंठे एवढी जमीन रोपवाटिकेसाठी आणि वृक्षसंवर्धनासाठी राखून ठेवली जाईल.

6. पीक घेण्याचे क्षेत्र समाजातील लोकांच्या सहकार्यातून व विचार-विनिमयातून निश्चित केले जाईल. पिकांना पाणी देण्याबाबत सर्व सभासदांची चर्चा करून रब्बीला व खरीप पिकांना किती प्रमाणात पाणी द्यावयाचे हे निश्चित धोरण ठरविले आणि ते सर्वांना बंधनकारक करण्यात आले. या पध्दतीने पाणी वाटप केले आहे.[9]

आपल्याभोवती जमिनीवर पडणारे पावसाचे पाणी नद्या, नाले, ओढे यांच्यामार्फत किंवा जमिनीखाली जावून विहिरींच्या वाटेने आपल्याला उपलब्ध होते. म्हणजेच अगदी "माझ्या" विहिरीला आलेले पाणी देखील आसपासच्या प्रदेशात पडून मुरलेल्या पावसाचे पाणी असते. त्यामुळे पाणी ही सर्वांची म्हणजे सार्वजनिक मालमत्ता आहे. ती निसर्ग संपत्ती असल्याने सर्वांना तिचा समान लाभ मिळणे आवश्यक आहे. पण आज हे "पाणी" मूठभरांच्या शेतात अडकून पडले आहे. ते समतेचे साधन न राहता विषमतेचे वाहन बनले आहे. दुष्काळापासून संरक्षण देणारा "संरक्षणात्मक पाटबंधारे" विकास झालेलाच नाही. सध्याच्या पाणीवाटप आणि पाणी वापर याबाबतही विषम विकास झालेला आहे. हा विकास समतोल साधणारा व शेतक-याला स्वतःच्या पायावर उभा करणारा तरी नाहीच, परंतु त्यामुळे प्रादेशिक व वर्गीय विषमता मात्र मोठया प्रमाणात वाढलेली आहे.[10]

बळीराजा धरणाने वरील सर्व परिस्थितीत आमूलाग्र बदल करण्यासाठीच समान पाणी वाटपाचे धोरण स्वीकारुन एक प्रकारे पाणी वाटपाच्या धोरणाला नवी दिशा दिलेली आहे. या धोरणाने समाजातील मूठभर लोकांची पाण्यावर असलेली मक्तेदारी तर संपुष्टात येणार आहे. त्याचबरोबर अनेक वर्षे "पाणी-पाणी" करून तडफडत असलेल्या समाजातील दुर्लक्षित अशा घटकाला पाण्याचा योग्य वाटा प्राप्त होणार आहे.

तसेच धरण होण्याअगोदर पासून धरणाचे पाणी आपल्या वाटयाला जास्त कसे येईल, या स्वार्थांधतेने पछाडलेले लोक अनेक कृत्ये करताना आढळतात. परंतु बळीराजा धरणाबाबत मात्र असा प्रकार झालेला नाही.

दुष्काळाची झळ सर्वांना असते· दुष्काळ घालवायचाच असेल तर सर्वांचाच घालविणे आवश्यक आहे· याचा सांगोपांग विचार करून बलवडी-तांदुळवाडीच्या ग्रामस्थांनी बळीराजात साठणा-या पाण्यावर सर्वांचा समान हक्क प्रस्थापित केला· त्यासाठी करारपत्र तयार करून प्रतिज्ञापत्राव्दारे पाणी वाटप केले· तसेच भागधारकांना प्रमाणपत्रेही देण्यात येवून या पाणी वाटप पध्दतीला कायदेशीर बैठक देण्यात आली·

बळीराजा स्मृती धरणाच्या भागधारकाचे प्रमाणपत्र :-

बळीराजा धरणातील पाण्याचा हक्क मिळविण्यासाठी प्रत्येक भागधारकाला 10 रूपये रोख देवून, अगर एक दिवसाचे श्रमदान करावे लागते· यानंतरच त्या व्यक्तीला बळीराजा धरणाच्या भागधारकाचे प्रमाणपत्र देण्यात येते·

"बलवडी (भा·) व तांदुळवाडी येथील कष्टक-यांच्या श्रमातून निर्माण झालेल्या भांडवलाच्या आधारावर आणि विद्यार्थी व कष्टक-यांच्या सामुदायिक श्रमदानावर तयार होणा-या "बळीराजा स्मृती धरण" या धरणातील पाणी वापरण्याबद्दलचा हक्क-शेअर्स घेतला आहे· 150 मि·मि·पध्दतीने संरक्षक पाणी पुरवठा मिळण्याचा हक्क त्यांना आहे· एकूण शेअर्स धाकांना समान पाणी वाटप करण्याच्या तत्वावर त्यांना जेवढा वाटा येईल तेवढे पाणी घेण्यावर त्यांचा अधिकार आहे·"

या पध्दतीचे प्रमाणपत्र स्वीकारीत असताना भागधारकाला पुढील प्रतिज्ञा-पत्र धरण संघटनेला सादर करावे लागते·

"सामुदायिक श्रमातून साठलेल्या व निसर्गाने दिलेल्या पाण्यावर, श्रमात व प्रयत्नात सहभागी होणा-या सर्वांचा समान हक्क आहे आणि यात गरीब-श्रीमंत यांना समान वाटा मिळालाच पाहिजे· कुठल्याही मार्गाने कोणालाही अधिक भागावर हक्क गाजविता येणार नाही व गाजवू देता कामा नये असे माझे ठाम मत आहे, या त-हेचे पाणी वाटप पध्दतीला योग्य, उत्पादनवाढ देणारी पीक पध्दती सामुदायिक रीतीनेच ठरविली जाऊ शकते या तत्वाशी मी बांधील आहे·"[11]

या प्रकारे बळीराजा धरणातील पाण्याची वाटणी समान पध्दतीने केली आहे· धरणात साठणा-या 20·5 दशलक्ष घनफूट पाण्यातून प्रत्येकाला समान पध्दतीने एक

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

हेक्टर {2·5 एकर} जमिनीला 150 मि·मि·पाणी देण्यात येईल· म्हणजेच प्रत्येक व्यक्तीला सुमारे 6,00,000 लिटर इतके पाणी वाटणीला येणार आहे· या पाण्यावर सर्व कुटुंबाचा, व्यक्तींचा अधिकार आहे· त्यामुळे बलवडी व तांदुळवाडी या दोन्ही गावातील प्रत्येक घरातील श्रमिकांना, स्त्रियांना, भूमिहिनांना, परित्यक्ता व विधवा महिलांना भागधारक बनविण्यात आले आहे· या प्रकारे सामुहिक शक्तीतून, सहकारी तत्वामधून बांधण्यात आलेले आणि समान पाणी वाटप करणारे बळीराजा धरण हे देशात आदर्श मार्गदर्शक म्हणून पुढे येत आहे·

या पध्दतीने पाण्याचे शास्त्रीय, योग्य आणि समान पध्दतीने पाणी वाटप सुरू केले आहे· त्यामुळे प्रचलित असलेल्या अशास्त्रीय व अयोग्य पाणी वाटपामुळे निर्माण झालेल्या क्षारयुक्त पडीक जमिनीच्या प्रश्नावर रामबाण उपाय तर सापडलाच त्याचबरोबर या समान पाणी वाटपाच्या धोरणामुळे आणि सार्वजनिक नियंत्रणामुळे पाटकरी, नोकरशहापासून ते मंत्र्यापर्यंत सर्वांना भ्रष्टाचाराचे जे "पाणी" चढले आहे ते उतरविण्यास उतारा प्राप्त झालेला आहे· बळीराजाच्या समान पाणी वाटप धोरणामुळे प्रशासनातील गैरमार्गांना निर्बंध तर बसणार आहेच त्याचबरोबर प्रचलित पध्दतीत होणारा पाण्याच्या गैरवापरास पायबंद बसून वाया जाणा-या पाण्याचा योग्य पध्दतीने वापरसुध्दा करता येईल· तसेच "ज्यांना जास्त जमीन, त्यांना पाणी जास्त" हे पाणी वाटपाचे प्रचलित विकासनीतीचे तत्वही संपुष्टात येईल अशी आशा वाटते·

### 7· स्त्रीशोषणमुक्ती :-

बळीराजा धरण चळवळीने कष्टकरी जनतेची दुष्काळाच्या मगरमिठीतून सुटका करण्यासाठी प्रयत्न केलेलाच आहे त्याचबरोबर स्त्रीला समाजाच्या अनेक अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा यांच्या बंधनातून मुक्त करण्याचाही उद्देश सफल केला आहे· प्रस्थापित विकासनीतीने आजही स्त्रियांचे वेगवेगळ्या प्रकारे शोषण चालू आहे· त्याला प्रखर विरोध चळवळीने केला· त्यासाठी चळवळीने स्त्रियांची स्वतंत्र चळवळ उभारली आहेच परंतु बळीराजा धरणाच्या निमित्ताने स्त्रीला समाजात मानाचे, हक्काचे आणि प्रतिष्ठिचे स्थान प्राप्त करून दिले आहे·

बळीराजाच्या उभारणीत महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे· पुरूषांच्या बरोबरीने येथील कष्टकरी स्त्रिया बळीराजाच्या लढयात सामील झालेल्या होत्या· तसेच

धरण बांधकामातही त्या आघाडीवर होत्या. बळीराजाच्या समान पाणी वाटपाच्या धोरणानुसार स्त्रियांनाही धरणातील पाण्याचा भाग/हिस्सा मिळाला आहे. तसेच विधवा, परित्यक्ता, भूमीहीन स्त्रियांनाही पाण्याचा वाटा मिळाला आहे. हा वाटा त्यांना जमीन मालकांना विकता येतो किंवा दुस-याची जमीन कसण्यासाठी वापरता येतो. त्यामुळे अशा स्त्रियांना पाण्याचा वाटा हे एक उत्पादनाचे साधन म्हणून उपलब्ध झाले आहे. तसेच धरणावरील रोपवाटिका योजनेत अशा स्त्रियांना जास्तीत जास्त रोजगार उपलब्ध करून दिला आहे. स्त्रियांना पाण्याचा वाटा देवून देशात प्रथमच एक क्रांतीकारक पाऊल बळीराजाने उचलले आहे. समान पाणी वाटप धोरणामुळे स्त्रियांना पाण्याचा हक्क प्राप्त होऊन या हक्काच्या पाणी भांडवलावर अशा अनेक महिलांचे उद्ध्वस्त झालेले संसार पुन्हा नव्या जोमाने उभे राहू लागले. एकंदरीत बळीराजामुळे स्त्रियांना आपल्या हक्कांची जाणीव तर झालीच त्याचबरोबर ती स्वतंत्र, स्वावलंबी, निर्भर जीवन जगू लागली.

8. **सहकारी पाणी वितरण व्यवस्था** :-

बळीराजा धरणातील पाणी वाटपाचा संपूर्ण अधिकार भूमिहीन, गरीब शेतकरी, शेमजूर, स्त्रिया याप्रकारच्या राबणा-या जनतेला आहे. तरी परंतु पाण्याचे योग्य पध्दतीने, नियमानुसार आणि यशस्वीरित्या वाटप व्हावे यासाठी कष्टकरी जनतेने "बळीराजा जलसंवर्धन व वितरण विकास संस्था" स्थापन केली. तिचे नोंदणीकरण करण्यात आले आहे. या संस्थेला **"नोंदणी क्र. महाराष्ट्र/2061/सांगली"**नुसार सरकारी मान्यता मिळाली आहे. समाजाच्या सर्व थरातील लोकांचा विचार करून समाजातील सर्व घटकांना यामध्ये प्रतिनिधित्व देण्यात आले आहे. तसेच दोन महिलांनाही प्रतिनिधित्व देवून एकूण 13 सभासदांचे या संथेचे पहिले कार्यकारी मंडळ निवडले गेले.

1. संपतराव पवार (अध्यक्ष)
2. देवकुमार दाजी दुपटे (उपाध्यक्ष)
3. मारुती मलू जाधव (सेक्रेटरी)
4. दिनकर तुका पवार
5. जोतीराम आनंदा पवार
6. हरीदास कृष्णा पवार
7. पांडूरंग चव्हाण
8. विलास बाळू चव्हाण
9. लक्ष्मण दुपटे
10. कॉ. जयंत निकम
11. दिनकर नारायण कास्कर
12. श्रीमती सावित्रीबाई रंगराव चव्हाण
13. श्रीमती सखुबाई विष्णू सावंत

याप्रकारे बळीराजा पाणी वाटप समिती आहे. अलिकडे संपतराव पवार यांनी या संस्थेच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यामुळे विलास बाळू चव्हाण यांची अध्यक्षपदावर निवड करण्यात आली आहे.

या विकास संस्थेत महिलांना प्रतिनिधित्व दिल्यामुळे महिला वर्गाने या पाणी वाटप पध्दतीचे अतिशय उत्साहाने स्वागत केले आहे. या प्रतिनिधित्वामुळे प्रथमच पाण्याच्या हक्काबाबत निर्णय घेण्याची संधी महिलांना प्राप्त झालेली आहे. त्यामुळे महिला वर्ग आनंदी झालेला आहे. बळीराजाचे मुख्य प्रवर्तक डॉ.भारत पाटणकर यांच्या मते बळीराजा निर्मिती आणि पाणी वाटपाच्या सर्व प्रक्रियामध्ये स्त्रियांचा सर्वात महत्त्वाचा वाटा व सहभाग आहे. त्यातून त्यांना आपलाही पाण्यावर तेवढा हक्क आहे. याची जाणीव झाली आणि यातून काही प्रमाणात स्त्री मुक्ती आंदोलनाला पूरक वातावरण तयार झाले.[12] या पाणी वाटप पध्दतीने पाणी हक्क आणि पाणी वाटपाबाबत जुन्या रूढी व परंपरा यांना विरोध तर केलेला आहेच त्याचबरोबर त्यांचे संपूर्णपणे उच्चाटन करण्याचा एक नवा प्रयोग सुरू केलेला आहे.

बळीराजा जलसंवर्धन व वितरण विकास संस्थेच्या विश्वस्त मंडळात नोंदणीकरण करण्यात आले. पण सर्वात मोठा दर्जा हा पाणी वापरणा-यांना देण्यात आला आहे. बळीराजा धरणातील पाणी व्यक्तिगतरित्या वाटप न करता, सहकारी तत्वावर वाटप करण्यात आले आहे. पाणी वापरणा-या शेतक-यांच्याकडेच पाण्याचे वाटप, नियंत्रण व त्याच्याशी निगडीत इतर सर्व गोष्टींचे नियोजन करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. समान पाणी वाटप व पाण्यावरील सामूहिक मालकीच्या धोरणामुळे सर्वसामान्य लोकांचे संसार नव्याने उभे राहू लागले आहेत.

9. **पर्यायी शेती पध्दत :-**

स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात शेतीचे जे व्यापारीकरण व भांडवलीकरण होण्यास सुरूवात झाली. त्यातून शेतक-यांचे "परावलंबन" वाढत गेले. जमीन, पाणी, जंगले, पीक पध्दती, बाजारपेठ, भांडवल आणि अगदी विज्ञान-तंत्रज्ञान हे देखील अशा पध्दतीने राबवण्यास सुरूवात झाली की, जिथे मूठभरांचा लाभ होता. पण बहुसंख्य शेतकरी-शेतमजूरांचे शोषण, दारिद्रय व परावलंबन वाढतच गले. शेतीचे

उद्योगधंद्याशी, बाजारपेठेशी, नव्या तंत्रज्ञानाशी ज्या भांडवली विकासाच्या पध्दतीने गाठ बांधली गेली ती पध्दती शेती व शेतक-याला घातक ठरली. या विकासनीतीने भांडवलदार, व्यापारी, सावकार, साम्राज्यवादी यांच्या नफ्याच्या प्रमाणात वाढ झाली व या मंडळींना नफा प्राप्त करून देण्यासाठी शोषणाच्या, विषमतेच्या, दडपणुकीच्या, गाजर दाखवून फसवणूकीच्या त-हा वापरून शेतकरी, शेतमजूरांना लुबाडावयाचे आणि नग्न करावयाचे अशी ही नीती आहे.

हरित क्रांतीनंरतही या परिस्थितीत फारसा फरक पडलेला नाही. हरित क्रांतीने काही विशिष्ट प्रदेशातील मूठभर वरिष्ठ थरातल्या शेतक-यांचे मळे व बँक खाती फुलली हे कटू सत्य मात्र नाकारता येणार नाही.

अशा अवस्थेत आजच्या शेतीला परावलंबित्वातून बाहेर काढण्याची निकड तयार झाली आहे. त्यासाठी पर्यायी शेती पध्दतच समाज विकासाचा व समृध्दीचा मार्ग मोकळा करू शकते. याची सत्यता पटू लागली.

पर्यायी शेती म्हणजे प्रस्थापित शेती पध्दत बदलून फक्त एक नवीन पध्दत असे नसून समाजाच्या गरजा भागविण्यासाठी निसर्गाचे संतुलन साधून उत्पादनाचे स्त्रोत कायम विकसित करीत जाणारी शेती पध्दती होय.

पारंपरिक शेतीतील चांगल्या अंगाबरोबरच विकसित पर्यावरणाभिमुख तंत्रज्ञानाचा वापर करून शास्त्रीय दृष्टिकोणासह शेती करणे.

पावसाच्या व दिलेलया पाण्याचा पूरेपूर वापर होण्यासाठी जमिनीचा कस वाढावा म्हणून जैविक घटकांचा वापर करणे.

सूर्य शक्तीचा जास्तीत जास्त वापर अन्नशक्ती रूपांतर होण्यासाठी करता यावा असे शेतीचे नियोजन करणे.[13]

हा पर्यायी शेती पध्दतीचा दृष्टीकोण स्वीकारून दुष्काळ निर्मूलनासाठी कार्य करीत असलेल्या मुक्ती संघर्ष चळवळ आणि बलवडी-तांदुळवाडीच्या कष्टकरी जनतेने बळीराजा धरणाची उभारणी केली. या धरणामार्फत पर्यायी शेती विकसित करण्याचा त्यांनी प्रयोग सुरू केला आहे.

**संतुलित पीक पध्दती :-**

बळीराजा धरणातीलपाणी समान पध्दतीने प्रत्येक भागधारकाला 150 मि·मि· इतके मिळणार आहे· या पाण्यावर येणारी पिके घेणे गरजेचे होते· तसेच पर्यावरण संतुलन राखण्यासाठी आणि कमीत कमी पाण्यात येणारी पिके घेण्याच्या दृष्टीने संतुलित पिकरचना स्वीकारण्याचे सर्व भागधारकांनी ठरविले· समान पध्दतीची पिके बळीराजाच्या पाण्यावर घेवून पूर्वीच्या पारंपरिक आणि जादा पाणी लागणा-या पीक पध्दतीला बाजूला ठेवण्याचे सर्वांनी ठरविले· तसेच समाजाच्या गरजा भागविणारी, जमिनीचा कस वाढविणारी, ठरवून दिलेल्या पाण्यात येणारी आणि भागधारकाला व त्याच्या कुटुंबाला स्वावलंबी बनविणारी या प्रकारची संतुलित पीक पध्दती बळीराजाने स्वीकारली· मिश्रपीक, आंतरपीक घेवून चारा वैरणीपासून सगळ्या शेतीचे नियोजन कष्टक-यांनी केले· एकंदरीत गावक-यांनी उपलब्ध पर्जन्य, पाणी याचा विचार केला· टंचाई परिस्थिती आणि काही व्यापारी पिके यांना पूरक अशा जलसिंचन योजनेचा विचार करून बळीराजा धरण समितीने शास्त्रीय अभ्यासावर आधारित तयार केलेल्या संतुलित पीक पध्दतीला मान्यता दिली· या पीक पध्दतीनुसार प्रत्येक भागधारकाच्या अडीच एकर जमिनीमध्ये अन्नधान्य, हंगामी, फळबागा आणि वनशेती केली जाणार आहे· सर्वसाधारण अडीच एकरामध्ये आरोग्यपूर्ण, आनंदी आणि पर्यावरणासाठी आवश्यक अशा प्रकारची संतुलित पीक पध्दतीची शेती केली जाणार आहे· पाण्याचे समान पध्दतीने वाटप योजनेमध्येही पुढील पध्दतींचा पाणीवाटप आराखडा तयार केला आहे·

1· **संरक्षित जलसिंचन योजना :-**


बळीराजाची उभारणी मूलतः दुष्काळ हटविण्यासाठी झाली आहे· खरीप हंगामाच्या वेळी या भागात पावसाची अनिश्चितता मोठी असते· पीक वाढीच्या काळात पुरेसा पाऊस न झाल्याने पिकांची वाढ खुंटते आणि ब-याच वेळेला पीक पाण्याअभावी वाळून जाऊन, हंगाम फोल ठरून टंचाईची परिस्थिती निर्माण होते· अशा मोक्याच्या वेळी जर पिकाला आवश्यक पाणी दिले तर पिकाचे संरक्षण होऊन उत्पादन निश्चित येते आणि म्हणूनच बळीराजाच्या पाण्याचा खरा उपयोग या प्रकारच्या जलसिंचनासाठी करण्याचे ठरले आहे· या जलसिंचन योजनेतून सुमारे 600 एकर जमिनीला (क्षेत्राला) पाणी देण्यात येणार आहे· यामध्ये संकरीत ज्वारी, भूईमूग ही पिके घेतली जातात·

तालिका क्र. २

# संतुलित पिकपद्धतीचा ।

## नियोजित आराखडा

### १) अन्नधान्य





उंच जाणारी झाडे
साग– ५०
रामकाठी
बाभूळ– ५०
निलगिरी– ५०
सुरु– ५० (लागणारे पाणी– ८०० घन मीटर)
आंवा फळझाडे– ५

हायब्रीड ज्वारी ४० आर (४००० चौ. मि.)

वारमाही तूर
शेवगा – २५
ग्लिरीसीडीया
क्षेत्र १३ आर १३०० चौ. मि.


### २) हंगामी



उंच जाणारी झाडे

भुईमूग
मिरची
भाजीपाला
क्षेत्र २० आर २०० चौ. मि.
लागणारे पाणी– २०० घन मि.

### ३) फळशेती




उंच जाणारी झाडे

| | | |
|---|---|---|
| बोर | – | १०० |
| डाळिंब | – | ७५ |
| लिंबू | – | १० |
| कवठ | – | २ |
| चिंचा | – | २ |
| सिताफळ | – | १० |

क्षेत्र २० आर (२००० चौ. मि.)
(दोन झाडातील अंतर १० फूट)
लागणारे पाणी– २०० घन मि.

### ४) वनशेती



| | | |
|---|---|---|
| ऑस्ट्री. बाभूळ | – | २०० |
| गुळभेंडी | – | १०० |
| लिंब | – | १०० |
| शिसव | – | २०० |
| सुरु | – | २०० |
| निलगिरी | – | ७५० |
| सिताफळ | – | १५० |
| ग्लिरीसीडीया | – | २५० |

क्षेत्र २६ आर (२६०० चौ. मि.) (दोन झाडातील अंतर ४ फूट व दोन ओळीतील अंतर ८ फूट) (लागणारे पाणी २०० घन मि.)

2· **संरक्षित जलसिंचनातून फळबागा जोपासणे** :-

बळीराजा धरणातील पाण्यातून फळबागाची लागवड करून शेतक-यांच्या आर्थिक उन्नतीला हातभार लावला जाणार आहे आणि त्यातून शेतकरी स्वावलंबी बनविण्याचा हेतू आहे· परंतु अशा प्रकारच्या फळबागा केवळ कमी पावसावर आणि कमीत कमी बळीराजा धरणाचे पाणी वापरून येणा-या असतील· बळीराजा धरणाच्या प्रत्येक भाग धारकाची एक एकर जमीन याप्रमाणे बलवडी-तांदुळवाडी या दोन्ही गावाची सुमारे 400 एकर जमीन या प्रकारच्या जलसिंचनाखाली येणार आहे· भागधारकाच्या या एका एकरामध्ये घ्यावयाची फळपिके सर्वानुमते आणि शास्त्रशुध्द माहितीच्या आधारे ठरविण्यात येवून सर्वांनी ठरवून दिलेली फळपिकेच घ्यायची असे बंधन घालण्यात आले आहे· शेतक-याच्या आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक असणारी अशा प्रकारची फळे, वनस्पती निर्माण करण्याचा उद्देश या जलसिंचन योजने पाठीमागे आहे· अशा फळ शेतीमध्ये प्रामुख्याने बोर, डाळिंब, लिंबू, सिताफळ, कवठ, बीब्बा यांचा समावेश करण्यात आला आहे·

3· **संरक्षित जलसिंचनातून वनशेती जोपासणे** :-

प्रत्येक कुटुंबाची जळण, इमारतीचे लाकूड अशाप्रकारच्या गरजा भागविणारी आणि जमीनीचा पोत सुधारण्यासाठी आवश्यक असलेले जैविक घटक पुरविणारा पालापाचोळा, पर्यावर संतुलन राखणारी आणि पावसाळ्यात पाणी मुरविण्याचे व्यापक काम करेल अशी वनशेती बळीराजाच्या पाण्यातून केली जाणार आहे· अशाप्रकारची वनशेती कृषी उद्योगाचा आधार ठरून समाजविकासाचा आणि समृध्दीचा मार्ग मोकळा करू शकते· म्हणून बळीराजा धरणाच्या पाण्यावर बाभूळ, गुलभेंडी, लिंबू, शिसव, सुरू, निलगिरी, बांबू, घायपात इ·चा समावेश असणारी वनशेती केली जाणार आहे· या प्रकारची वनशेती प्रत्येक भाग-धारकाच्या 20 आर (गुंठे) क्षेत्रात केली जाणार आहे·

4· **संरक्षित जलसिंचनातून हंगामी शेती करणे** :-

बळीराजा धरणातील पाण्यातून प्रत्येक भागधारकास 20 आर क्षेत्रात हंगामी शेती करता येईल· या शेतीत भूईमूग, मिरची, भाजीपाला या प्रकारची पिके असतील·

5. **अवर्षण काळातील चारा उत्पादक :-**

जेव्हा जेव्हा दुष्काळाची परिस्थिती निर्माण होईल त्यावेळी दोन्ही गावांनी चारा उत्पादनाची "बलवडी (भा) शास्त्रीय लोकयोजना" अमंलात आणायची असून त्यामध्ये केवळ जनावरांसाठी चा-याचे उत्पादन काढायचे आहे. दुष्काळात जनावरांची सर्वात जास्त उपासमारी होते. म्हणून या योजनचे महत्त्व गावक-यांनी शासनाला पटवून दिले आहे. परंतु अद्यापही शासनाने त्याबाबत निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे कष्टक-यांनी शासनाला पटवून दिले आहे. परंतु अद्यापही शासनाने त्याबाबत निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे कष्टक-यांनी स्वतःच ही योजना दुष्काळ परिस्थितीमध्ये अंमलात आणावयाचे ठरविले. अशा परिस्थितीत चारा कोणता, कसा घ्यावा, याबद्दल शेतीतज्ञ, कृषी खाते आणि कृषी विद्यापीठाचे मार्गदर्शन घेण्यात येईल.

xxx **असं फुलणार आहे रान, असे उजळणार आहे राबणा-यांच जीवन** .....

बळीराजा धरणातील पाण्यातून कमी पाण्यावरील फळबागा, अन्नधान्ये, कडधान्ये, भाजीपाला व वनशेती करण्याचे निश्चित केले आहे. बळीराजा धरणातून सर्वसामान्य परिस्थितीमध्ये संरक्षित पध्दतीनेच जलसिंचन करण्यात येऊन खालील कोष्टकात दाखविल्याप्रमाणे पिकांची रचना करण्यात येणार आहे.[14]

**तालिका क्र. 3**

**प्रतिकुटुंब/भागधारकांच्या एक हेक्टर क्षेत्रातील पीक रचना**

| अ.नं. | पीक | संख्या/क्षेत्र | वार्षिक उत्पन्न | उत्पादन रु. प्रति क्विंटल नग | खर्च वजा जाता |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1. | संकरीत ज्वारी | 1 एकर | 15 क्विंटर | 100 रु. | 1500/- |
| 2. | तेलबिया | 1/2एकर | 05 क्विंटल | 400 रु. | 2000/- |
| 3. | गणेश डाळींब | 75 झाडे | 7000 नग | 025 पैसे | 1750/- |
| 4. | लिंबोणी | 75 झाडे | 14000 नग | 05 पैसे | 700/- |
| 5. | संकरीत बोरे | 75 झाडे | 10 क्विंटल | 200 रु. | 2000/- |
| 6. | सागवृक्ष | 25 झाडे | 08 नग प्रतिवर्ष प्रतिझाड | 100 रु. | 2500/- |

| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
|---|---|---|---|---|---|
| 7. | सीताफळ | 50 झाडे | 2500 नग | 020 पैसे | 500/- |
| 8. | आंबा हापूस पायरी | 02 झाडे | 100 नग | 1 रुपाया | 100/- |
| 9. | चिंच | 02 झाडे | 5 क्विंटर | 200 रु. | 1000/- |
| 10. | कवठ | 02 झाडे | 100 नग | 1 रु. | 100/- |
| 11. | फणस | 01 झाड | 50 नग | 2 रु. | 100/- |
| 12. | आवळा | 01 झाड | 500 नग | 1 पैसा | 50/- |
| 13. | ऊस | 12 खड्डे | 1.5 टन | 400 रु. | 600/- |
| 14. | बांधावर निलगिरी | 1400 झाडे | प्रति झाडास | 1 रु. | 1400/- |
| 15. | जनावरासाठी चारा/वैरण | -- | 4 टन | 400 रु. | 1600/- |
| | | | | एकूण उत्पादन रु. | 15900/- |
| xxx | झाडांची पाने/गवत इ.पासून कंपोस्ट खत रु. | | | | 2000/- |
| xxx | दोन व्यक्तींना वर्षभर रोजगार उपलब्ध | | | | 8000/- |
| | | | | एकूण उत्पादन | 25900/- रुपये |

कमीत कमी पाण्यात जास्तीत जास्त शेती फुलविणे, वनशेती नैसर्गिक पाला-पाचोळ्याच्या आधारावर जास्तीत जास्त टिकावू व स्वयंनिर्भर शेती पध्दत प्रत्यक्षात आणण्यासाठी बळीराजा धरणाच्या पाण्यावर वरील प्रमाणे संतुलित पिकरचना आणि उत्पादकतेचे नियोजन केले आहे. त्यानुसार पाण्याचे समान वाटप व सामुदायिक पाण्याचे समान वाटप, संतुलित पिक रचना पध्दती व बहुउद्देशीय शेती पध्दतीचा शास्त्रीय दृष्टीकोणातून अवलंब केलेला आहे. त्यामुळे इथे कोणावरही अन्याय होणार नाही. या बहुउद्देशीय शेती पध्दतीमुळे येथील राबणा-यांच्या जीवनात अमूलाग्र बदल तर होणारच आहे. त्याचबरोबर राबणारांचे मानसिक संतुलन राखून निसर्ग समतोल ठेवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. या संतुलित

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

पीक पध्दतीची काही वैशिष्टये पुढीलप्रमाणे दिसून येतात.

1. या संतुलित पाणी पध्दतीनुसार एका कुटुंबाला अडीच एकर जमीन भिजेल एवढी पाण्याची हमी (गॅरंटी) मिळालेली आहे. या अडीच एकरामध्ये एक एकर हायब्रीड ज्वारी (संकरीत ज्वारी) अर्धा एकर भुईमूग, एक एकर विविध फळांची झाडे अशा पध्दतीने सामुदायिक पीक पध्दतीची आखली केलेली आहे. अशा या पध्दतीत अन्नधान्य उत्पादन पीक व व्यापारी उत्पादक पीक असे दोन विभाग पडलेले आहेत. अन्नधान्याच्या पीक उत्पादनात ज्वारी, भुईमूग, तेलबिया, भाजीपाला अशा प्रकारच्या पिकांचा समावेश आहे. तर आंबा, फणस, बोर, आवळा, निलगिरी, साग अशा प्रकारची व्यापारी उत्पादनाची पिकेही समाविष्ट केलेली आहेत.

2. एका कुटुंबाच्या वर्षभराच्या गरजांचा विचार करून अडीच एकरातील पिकरचनेचा आराखडा तयार केलेला आहे. या पीक पध्दतीतून उपलब्ध होणा-या वैरणीतून दोन बैल व एक दुभते जनावर सहज पोसण्याची योजना आहे. त्यामुळे प्रत्येक कुटुंबाला दूध तर उपलब्ध होईलच त्याच बरोबर या पीक रचनेमुळे फळे, पालेभाज्या, डाळी यांची उपलब्धता होईल व त्यामुळे कुटुंबाचे होणारे कुपोषण थांबणार आहे.

3. फळबागा व वनशेतीमुळे शेतक-याला वर्षभर खर्चासाठी आर्थिक उत्पादनाचे साधन तर प्राप्त होईलच त्याचबरोबर जमीनीची धूप, प्रत, तपमान व नैसर्गिक समतोल राखण्यास मदत होणार आहे.

4. एका कुटुंबाला सर्वार्थाने स्वयंपूर्ण करणे हे या पीक रचनेचे मुख्य ध्येय आहे. त्यामुळे या पीक रचनेमुळे अडीच एकरातून त्या कुटुंबाच्या जास्तीत जास्त गरजा भागविल्या जातीलच त्याचबरोबर कुटुंबातील दोन व्यक्तींना या शेतीत वर्षभर कायम स्वरूपी रोजगार मिळेल याची व्यवस्था केलेली आहे. त्यामुळे बेरोजगारीचा प्रश्न सुटण्यास काहीशा प्रमाणात मदत होणार आहे.

5. संतुलित पीक पध्दतीतून वर्षभर कोणत्या ना कोणत्या तरी फळांचे उत्पादन होत राहणार आहे. त्यामुळे त्या फळ विक्रीसाठी शेतक-याला सतत बाजारपेठेत जावे लागणार आहे. त्यामुळे त्याला बाजारपेठेचा कल, बाजारपेठेतील बदल, शेतीमधील

नवनवीन संशोधन याची माहिती मिळत राहील·

6· या संतुलित पीक रचनेमुळे स्वयंपूर्ण रोजगार उपलब्ध होणार आहे· त्यामुळे शेतकरी लाचार, कर्जबाजारी व परावलंबी राहणार नाही· तसेच त्यामुळे निर्भीडपणे आपले राजकीय मत मांडू शकेल व आपल्या पसंतीप्रमाणे लोकप्रतिनिधींची निवड करू शकेल·

7· संतुलित पीक रचना व समान पाणी वाटपामुळे थोडया शेतीत चांगले उत्पादन होऊ शकते या आत्मविश्वासाने व स्वानुभवाने शेतकरी इतरही आसपासच्या गावातील लोकांना त्याबाबत मार्गदर्शन करेल व इतर शेतक-यांच्यातही या प्रचारामुळे जागृती व मानसिक तयारी होऊन आपोआप देश स्वयंपूर्णतेकडे वाटचाल करेल·

8· समान पाणी पध्दतीमुळे जातपात, वंश, संप्रदाय अशा प्रकारचे भेद नष्ट होऊन सामाजिक समता तर प्रस्थापित होईलच त्याचबरोबर राष्ट्रीय एकात्मतेला बळकटी प्राप्त होईल·

9· या पीक रचनेमुळे होणा-या उत्पादनातून एका कुटुंबाचा सर्व त-हेचा (अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, औषध) खर्च तर भागणार आहेच शिवाय शेतक-यांची काही रक्कम शिल्लकही राहणार आहे· ही त्याची भविष्य निर्वाह निधीची रक्कमच असेल·

10· फळबाग आणि इतर पिकांसाठी रासायनिक खतांच्या वापराऐवजी कंपोस्ट खतांचा वापर या पध्दतीत करण्यात येणार असून अशा खतांची निर्मिती शेतातच खड्डे घेऊन झाडांच्या पालापाचोळ्यापासून करण्यात येईल· त्यामुळे शेतक-यांची आर्थिक बचत तर होईलच शिवाय रासायनित खतांच्या वापरामुळे जमीनीतून क्षार वर येणे, मीठ फुटणे जमीन, चिपाड होऊन नापीक बनणे अशासारखी परिस्थिती निर्माण होते· अशा प्रकारची परिस्थिती कंपोस्ट खतांच्या वापरामुळे निर्माण तर होणार नाहीच उलट जमिनीचा पोत, प्रत वाढण्यास मदत होईल·

11· या पध्दतीमुळे कमी पाण्यावरील फळबागा करून पाण्याची काटकसर केली जाणार आहे· केवळ वार्षिक 15 से·मी·$^3$ इतकेच पाणी प्रति झाडाला मिळेल असे

पाहिले जाईल. त्यासाठी प्रायोगिक तत्वावर झारी पध्दती, नरसाळे पध्दतीचा वापर सुरू आहे. अशा प्रकारे कमी पाण्यात व कमी खर्चात फळबाग तयार होऊन पाण्याचा योग्य पध्दतीने वापर तर होईलच. त्याचबरोबर अति पाण्यामुळे जमिनीत दलदल, जमिनीला क्षार फुटणे व चिबाडा सारखी जमीन तयार होऊन नापीक होते. अशा परिस्थितीला या पध्दतीमुळे तोंड द्यावे लागणार नाही.

12. संतुलित पीक पध्दतीच्या योजनेतून स्वयंपूर्ण कुटुंबे निर्माण होतील. या स्वयंपूर्ण कुटुंबाच्या समुहातून एकात्मिक ग्राम विकासाचे स्वप्न साकार होणार आहे. त्यामुळे गावांना ग्राम विकासासाठी शासकीय योजनांच्याकडे कायम डोळे लावून बसण्याची वेळ येणार नाही. तसेच शासनाचाही काही प्रमाणात यामुळे ग्राम विकासावरचा पैसा, वेळ व शक्ती यात बचत होईल. तोच पैसा, वेळ व शक्ती शासन इतर विकासासाठी खर्च करून राष्ट्र प्रगतीपथाकडे वाटचाल करू शकेल.

13. संतुलित पीक पध्दतीमुळे शेतक-यांची आर्थिक विंवचना संपुष्टात येऊन ते स्वयंपूर्ण होतील. तसेच आर्थिक स्थिती सुधारल्यामुळे त्यांच्यात सहकारी व सहजीवनाची भावना वृध्दिंगत होईल. तसेच सहजीवनामुळे समाजवाद, धर्मनिरपेक्षता ही तत्वे प्रत्यक्ष आचरणात आणण्यात मदत होईल.

14. समान पाणी वाटप व संतुलित पीक रचनेच्या योजनेनुसार बळीराजाने स्त्रियांनाही महत्त्वाचा वाटा दिलेला आहे. पाणी ही नैसर्गिक साधन संपत्ती मानून सर्व व्यक्तींना समान हक्क दिलेला आहेच. त्याचबरोबर महिलांनासुध्दा पाण्याचा वाटा दिलेला आहे. त्यामुळे कुटुंबातील स्त्रियांना आपल्या हक्काचे पाणी एकंदर कुटुंबाच्या शेतीवर एका ठराविक हिश्श्यात वापरून येणारे उत्पादन त्यांच्या हक्कांचे असल्यामुळे, उत्पादनाच्या क्षेत्रातील स्त्रियांच्या हक्कांच्या लढ्याची वाट मोकळी झालेली आहे.

15. भूमिहीन शेतमजूरांना समान पाणी वाटप योजनेमुळे पाण्याचा वाटा मिळणार आहे. त्यामुळे शेतक-याला हक्काचे पाणी वापरून शिल्लक राहिलेली जमीन तशीच पाण्याविना न ठेवता ती पाणी हक्कदार भूमिहीन शेतमजूरांना भाडेपट्टीने किंवा हिस्सा पध्दतीने देता येईल. या पध्दतीमुळे जमिनीच्या न्याय्य फेरवाटपाच्या स्थिरावलेल्या

लढयाची कोंडी फुटू शकेल·

16· वनशेतीमधून येणारे उत्पादन कृषी औद्योगिकरणाचा कच्चा माल म्हणून उपयोगात येऊ शकतो· त्यामुळे स्थानिक पातळीवरील कुटीरोद्योग, लघुउद्योग यांना चालना तर मिळेलच, त्याचबरोबर नवीन लहानमोठे उद्योगधंदे निर्माण करण्यास मदत होईल व या उद्योगधंद्यातून बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होईल·

17· फक्त संरक्षक पीक पध्दतीमुळे गरजेच्या वेळी पिकांना पाणी दिले तरी उत्पन्न दुप्पटीने मिळू शकते· हे या पीक पध्दतीने व समान पाणी वाटपाने स्पष्ट झाले आहे·

18· या पीक पध्दतीमुळे शेतक-यांना जळण, इमारतीसाठी लाकूड तर उपलब्ध होईलच त्याचबरोबर शेतीतून औषधीयुक्त वनस्पतीची निर्मिती होईल·

19· ही पीक पध्दती म्हणजे एक साचा किंवा समीकरणाचा आराखडा नसून प्रादेशिक, भौगोलिक व वाढत्या अनुभवाच्या आणि ज्ञानाच्या आधारावर सातत्याने तिचा विकास होत जाणार आहे· पाण्याच्या व जमिनीच्या शास्त्रीय नियोजनाने केळी व ऊसासारखी पिके घेणे शक्य झाले आहे·

या पध्दतीने बळीराजाच्या पाण्यावर पीक पध्दतीने नियोजन करून राबणा-यांना स्वयंपूर्ण बनविण्याचे ध्येय पूर्ण करण्याचे ठरले असून त्याचबरोबर या कष्टक-याला स्वाभिमानी, निर्भयी बनविण्याचे उद्दिष्ट साकार करण्याचे ठरविले आहे· या पीक पध्दतीने व समान पाणी वाटप योजनेनुसार, दुष्काळाचे कायम सावट असलेल्या व दुष्काळाच्या भीषण परिस्थितीतून होरपळून कायमस्वरूपी जर्जर झालेल्या शेतकरी-शेतमजूरांना मुक्त करण्यात येईलच· त्याचबरोबर राबणा-यांच्यामध्ये दुष्काळावर मात करण्याची शक्ती येईल· बळीराजाने समान पाणी वाटपाचे तत्व प्रत्यक्षात अंमलता तर आणण्याचे ठरविले असून त्याचबरोबर पर्यावरण संतुलन, पाणी मुरविणारी, व्यापक वृक्ष लागवड साध्य करणारी, जास्तीत जास्त स्वयंपूर्णता आणणारी, जमिनीचा कस वाढवून तो टिकविण्याची व्यवस्था करणारी पीक पध्दत व्यापक क्षेत्रावर अंमलात आणलेली आहे· जास्तीत जास्त व्यक्तींना दुष्काळ निर्मूलनात समाविष्ट करून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे· म्हणजेच बळीराजाने समान पाणी वाटप, संरक्षित जलसिंचन योजना व संतुलित पीक पध्दतीतून पर्यायी विकासनीतीची काही उद्दिष्टे साध्य केलेली आहेत असे म्हणण्यास हरकत नाही·

### xxx संदर्भ xxx


1· पाटणकर भारत, "पर्यायी विकासनीती", समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी, वर्ष दुसरे, 1991, पुस्तक दुसरे, पृ·7 ते 10

2· तत्रैव, पृ·11 व 12

3· समाजविज्ञान अकादमी, "स्वावलंबी शेतीविकास आणि नव्या आर्थिक धोरणाचे संकट", पुणे, मे 1992 पृ·38 व 39

4· कांबळे मधु, "सरकारला शह देणारा सांगलीचा बळीराजा", "श्री"§साप्ता·§,मुंबई दि·27 मे 1989 पृ·21

5· पाटणकर भारत, उ·नि·पृ·34

6· मुक्ती संघर्ष चळवळ, "खेडयातील गरीबांची झुंज", बळीराजा संवर्धन व वितरण विकास संस्था, बलवडी-तांदुळवाडी, पृ·4

7· पाटणकर भारत, उ·नि·पृ·34

8· तत्रैव, पृ·32

9· *Thukral E.G.and Sakate Machindra D.,'Baliraja A People's Alternative', Sage Publication, New Delhi,1992 Page 146*

10· समाजविज्ञान अकादमी, उ·नि·पृ·14

11· पाटणकर भारत व पवार संपतराव, "बळीराजा स्मृती धरण" माहिती पुस्तिका,पृ·12

12· पाटणकर भारत यांच्या दि·29/12/1993 च्या प्रकट मुलाखतीवरून उद्धृत

13· पाटणकर भारत, "दुष्काळ आणि दुष्काळ निर्मूलनाचे पर्याय", समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी, वर्ष तिसरे, 1992, पुस्तक पाचवे, पृ·55

14· गोफणे बी·एन·"बळीराजा स्मृती धरण" लोकसंख्येच्या जाणीव जागृतीव्दारे एक विकास चळवळ §संशोधन प्रकल्प§, वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड, पृ·38